निशाणी क्र. ३० वरील आदेश
**(CNRNo.MHOS140004942018)**

वादी यांनी दुरुस्ती करीता अर्ज दाखल केला आहे. वादी यांच्या कथनानुसार दावा दाखल करतेवेळी वादी क्र. २ आणि ३ अज्ञान असल्यामुळे वादी क्र. २ व ३ यांची पालनकर्ती म्हणून वादी क्र. १ यांनी दावा दाखल केला आहे. वादी क्र. २ आणि ३ सज्ञान झाली असल्यामुळे वादी क्र. २ व ३ यांचे वय आणि धंदा यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. वादी यांचे पुढे कथन असे की, वादी क्र. १ यांचे पती म्हणजेच वादी क्र. २ आणि ३ यांचे वडील आनंद शिंदे यांनी दावा मिळकतीचे प्रतिवादी यांना करून दिलेली बेकायदेशीर खरेदीखते वादी यांच्या मालकी हक्कवर बंधनकारक नाहीत आणि आनंद शिंदे यांचे पश्चात दावा मिळकतीचे वारसा हक्काने वादी मालक झाले आहेत असे जाहीर होऊन मिळणेकरीता दावा दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे दावा मिळकतींची विक्री केलेली आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी ज्या इसमांना दावा मिळकत विक्री केली आहे त्यांना प्रतिवादी म्हणून समाविष्ट करणे आणि जी खरेदीखते झाली आहेत ती वादी यांच्या मालकी हक्कावर बंधनकारक नाहीत अशाप्रकारे दाव्यामध्ये मजकूर समाविष्ट करणे आवश्यक आहे. सुचीत दुरुस्ती दावा प्रलंबीत असताना झालेली असून अदयाप पुरावा सुरु झालेला नाही. सुचीत दुरुस्ती अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती केलेस दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होत नाही. सबब, अर्ज मंजूर करावा अशी विनंती वादी यांनी केलेली आहे.

२. प्रतिवादी क्र. १ यांनी नि. ३६ वर म्हणणे दाखल करून अर्ज नाकारलेला आहे. प्रतिवादी क्र. १ यांच्या कथनानुसार सुचीत दुरुस्ती केल्याने दाव्याचे स्वरुप बदलणारे असून प्रतिवादी यांचे पैशात भरुन न येणारे नुकसान होणारे आहे. सबब, अर्ज खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती प्रतिवादी क्र. १ यांनी केली आहे.

३. वादी व प्रतिवादी क्र. १ यांच्या कथनांवरुन खालील मुद्दे उपस्थीत होत असून त्यांचे उत्तर निष्कर्शासह नोंदवत आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
| --- | --- |
| १. अर्ज मंजूर होणेस पात्र आहे का ? | होकारार्थी. |
| २. आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

४. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केल असता, मयत आनंद शिंदे यांनी प्रतिवादी यांच्या हक्कामध्ये दावा मिळकती संदर्भातने करून दिलेली खरेदीखते वादी यांच्या मालकी हक्कावर बंधनकारक नाहीत तसेच मयत आनंद शिंदे यांचे पश्चात वारसाहक्काने वादी मालक आहेत असे जाहीर होऊन मिळणेकरीता दावा दाखल केला आहे. दावा दाखल करतेवेळी वादी क्र. २ यांचे वय वर्षे १७ आणि वादी क्र. ३ यांचे वय वर्षे १४ नमूद केले आहे. दावा दि.२०.११.२०१८ रोजी दाखल केलेला आहे. सदर वस्तुस्थीतीचा विचार करता वादी क्र. २ आणि ३ सज्ञान झाले आहेत असे निदर्शनास येते. त्यामुळे वादी क्र. २ आणि ३ यांचे वय वर्षे आणि धंदा यामध्ये सुचीत दुरूस्ती अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करणेस परवानगी देणे उचीत होणारे आहे. वादी यांनी प्रस्तुत अर्जामध्ये जी खरेदीखते आणि प्रस्तावीत प्रतिवादी म्हणून समाविष्ट करण्यासाठी ज्या इसमांची नांवे नमूद केली आहेत त्यांच्या दरम्यान झालेल्या खरेदीखतांची सहीशिक्यांची नक्कल नि.३३/१ ते ३३/४ वर दाखल केली आहे. सदर खरेदीखतांचे अवलोकन केले असता प्रस्तुत अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावीत प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांच्या दरम्यान दावा मिळकती संदर्भाने खरेदीखते झालेली आहेत असे निदर्शनास येते. त्यामुळे प्रस्तावीत प्रतिवादी क्र. ४ ते ६ आणि त्यांच्या दरम्यान दावा मिळकती संदर्भाने झालेली खरेदीखते याबाबतचा मजकूर दाव्यामध्ये समाविष्ट होणे आवश्यक आहे. दावा चौकशीकरीता प्रलंबीत आहे. सुचीत दुरुस्ती अन्वये दावा दुरुस्त केलेस दाव्याचे स्वरुप बदलणारे नसून प्रतिवादी यांचे हक्क बाधीत होणारे नाहीत. सबब, याउलट दाव्याचा अंतिम निर्णय होणेसाठी तसेच वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान असलेल्या वादाचे अंतिम निराकरण होण्यासाठी सुचित दुरूस्ती प्रमाणे दाव्यामध्ये दुरूस्ती करणेस परवानगी देणे न्यायोचित आहे. सबब, अर्ज

खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. सबब प्रश्न क्र.१ चे उत्तर होकारार्थी देत असून प्रश्न क्र.२ बाबत खालील आदेश पारीत करत आहे.

आदेश

१. अर्ज रक्कम रुपये ५००/- खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी सुचित दुरूस्ती आदेश झालेल्या तारखेपासून विहीत मुदतीमध्ये दाव्यामध्ये दुरूस्ती करावी आणि दुरुस्त दाव्याची प्रत दाखल करावी.

स्वाक्षरीत/-
**(श्रीमती. जे. एन. यादव)**
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
परंडा.

दिनांक – ०१.०१.२०२४.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment/order/issues/evidence are same, word to word, as per the original judgment/order/issues/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Devidas S. Shiral,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Smt. J. N. Yadav<br>Jt. Civil Judge, Senior Division, Paranda,<br>District - Osmanabad. |
| Date | --- | 01/01/2024 |
| Judgment/order/issues/evidence signed by the Presiding Officer on | --- | 01/01/2024 |
| Judgment/order/issues/ evidence uploaded on | --- | 02/01/2024 |